# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१२/२०२३** **दिनांक २३/०८/२०२३**
**स्थळ- जिल्हा न्यायालय,अहमदनगर** **वेळ- दुपारी ०४.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सी.ए. नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.२३/०८/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असले बाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१९२५/२०२३, दि.२२.०८.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.२३/०८/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा. श्री. सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा. श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा. श्री. पी. शिवा शंकर, भा.प्र.से.,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

विषय नं.१ दि.२५.०७.२०२३रोजी अहमदनगर येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.५१२ दि.२५.०७.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. (कार्यवाही-सभाकामकाज विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------

विषय नं.२ चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सेवाप्रवेश विनिमय, २०२३ बाबत.

निर्णय क्र.५१३/1 चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------

२. श्री साईबाबा हॉस्पीटल परिसरामध्ये ५ वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर औषध दुकान चालविणे कामी देण्यात आलेला मे. रोहन एन्टरप्राईजेस, पुणे यांचा कार्यादेश रद्द करून त्यांना काळया यादीत टाकणेस तसेच त्यांचे जागेवर जन औषधीचे जेनेरिक औषध दुकान चालू करणेबाबत.

निर्णय क्र.५१३/२ नवीन निविदा काढून औषध दुकान चालवण्याबाबत कार्यादेश होईपावेतो किंवा पुढील सहा महिने यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत सद्या असलेले मित्रसेन मेडीकेअर, मुंबई यांना चालू अटी शर्तीनुसार मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. यासाठी मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.

मे.रोहीत एन्टरप्रायजेस,पुणे यांची संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम रु.२,००,०००/- संस्थानखाती जमा करणेस व त्यांचे नाव संस्थानच्या काळया यादीत टाकण्यास मंजुरी देण्यात आली.

जनेरीक औषधांच्या बाबतीत केलेल्या सुचनांची/त्रुटीचीं पुर्तता करुन फेर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------

विषय नं.३ संस्थानचे सर्व इमारतीमध्ये Emergency Exit Board व Evacuation Plan लावणेकामी येणारे रक्कम रु.६,७९,०००/-मात्रचे खर्चास व त्याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५१४ प्रस्ताव मंजुर. ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------

विषय नं.४ साई धर्मशाळा परिसरातील सर्व इमारतींचे आतील व बाहेरील बाजूने रंगकाम करणे व इमारतींचे संडास, बाथरुमचे नुतनीकरण करणे कामासाठी येणारे अपेक्षित रु.१५,२२,६३,२८१/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.५१५ दि.२१.०७.२०२३ रोजी मा.अध्यक्ष यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. इमारत हस्तांतर होऊन अकरा वर्ष कालावधी झाल्यामुळे दुरुस्तीची आवश्यकता आहे. प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.

(कार्यवाही-बांधकाम विभाग/ विधी विभाग)

---

विषय नं.५ शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतीकरिता फर्निचर वर्क, ऑडीटोरीअम फर्निचर, खेळाचे मैदाने विकसीत करणे व अनुषांगिक सिव्हिल व इलेक्ट्रीकलचे कामाचे सुधारीत रु.४६,५५,६८,५६७/- मात्रचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५१६ प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.

शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी संख्या सुमारे सात हजार पर्यंत राहणार आहे याचा विचार करता शैक्षणिक संकुलासाठी येण्याजाण्यासाठी रस्ता अरुंद असल्याकारणाने रस्त्याचा विस्तार करण्याची गरज आहे त्यासाठी आवश्यक भुसंपादनासह प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग/मालमत्ता विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.६ श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीकरिता आकर्षक नव्या तंत्रज्ञानाची विद्युत रोषणाई करणेसाठी एलईडी प्रोजेक्शन व श्री साईबाबांचे जीवन चरित्रावरील थीम तयार करणेसाठी सल्लागार नियुक्ती करीता EOI प्रसिद्ध करणेबाबत.

निर्णय क्र.५१७ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.७ उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडील भुसंपादन निवाडा एलएक्यु/एसआर/१०/२००० दि.१३.०८.२०१५ अन्वयेच्या निवाडयाप्रमाणे क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौ.मी.) चा ताबा संस्थानला मिळणेबाबत.

निर्णय क्र.५१८ भुसंपादन रद्द करण्यासाठी संस्थानने मा.जिल्हाधिकारी यांना कळविल्यामुळे त्यावर काय निर्णय झाला याबाबत सद्यस्थिती मागविण्यात यावी. त्या माहितीसह फेर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.८** **साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईउद्यान शिर्डी पोष्ट ऑफिसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ देऊन भाडेवाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.५१९** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.९** **साई धर्मशाळा, साई आश्रम भक्तनिवासस्थान विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इत्यादी दुरुस्ती व देखभालीचे कामे व व्दारावती भक्तनिवासस्थान विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छतेची कामे आऊटसोर्स पध्दतीने केलेल्या ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.५२०** **मा.उच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन न.३६८०/२०२३ नुसार खर्चास मान्यता दिलेली आहे. प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.१०** **EESL's Energy Programme अंतर्गत संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास येथील 'G' इमारतीमध्ये बसविण्यात आलेले १३६ नग जुने ७० वॅटचे सिलिंग फॅन काढून त्या जागी प्रायोगिक तत्वावर मे.एनर्जी एफिशिअन्सी सर्व्हिसेस लि., (EESL) यांनी Energy Saving करीता सुचविलेले BLDC सिलींग फॅन खरेदी करुन बसविणेकामी येणा-या खर्चास तसेच विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेकामी मान्यता मिळणेबाबत. (रु.६,६८,७६०/-)**

**निर्णय क्र.५२१** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.११** **संस्थानचे पानमळा गोडावूनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे व इतर अनुषंगीक यंत्रणा बसविणेकामी आवश्यक साहित्य खरेदी करणेबाबत. (रु.९,६२,४९२/-)**

**निर्णय क्र.५२२** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.१२** **सीसीटीव्ही यंत्रणेसाठी तांत्रिक समितीचे सदस्यते बाबत.**

**निर्णय क्र.५२३** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.१३** महाराष्ट्र शासनाचे महाआयटी विभाग, मुंबई यांनी **Shirdi Smart City** प्रकल्पाचे निविदा प्रक्रियेचे खर्चाबाबत. (रु.३५,००,०००/-)

**निर्णय क्र.५२४** शासनाचे महाआयटी विभाग, मुंबई यांनी केलेली खर्चाची मागणी नामंजूर करण्यात आली.

(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)

---

**विषय नं.१४** 'साईटेक प्रकल्प-२' अंतर्गत प्रस्तावीत अद्ययावतीकरण प्रस्तावात तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५२५** दोन्ही निम्नतम दरधारक यांचेशी सभेदरम्यान फोनवर वाटाघाटीबाबत चर्चा केली त्यांना त्यांचे अंतिम निम्नतम दर ई-मेलव्दारे पाठविण्याचे आवाहन केले ते प्राप्त झाल्यानंतर ज्यांचे दर निम्नतम असतील त्यांना कार्यादेश देण्यात यावा.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

**विषय नं.१५** नविन दर्शनरांग प्रकल्पांतर्गत **Time Based** मोफत दर्शनपास प्रणाली कार्यान्वीत करणेकामी निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.

**निर्णय क्र.५२६** प्रस्तावास तत्वत: मंजूरी.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

**विषय नं.१६** संस्थानचे **www.sai.org.in** व **online.sai.org.in** या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर भाडेतत्वावर घेणेबाबत.

**निर्णय क्र.५२७** प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.१७** आर्थिक वर्ष सन २०२२-२०२३ (दि.०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२३) देणगीदार व मान्यवरांची भेट देण्यात आलेली संस्थान प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणेबाबत.

**निर्णय क्र.५२८** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१८** सन २०२३-२४ करिता लाडू निर्मिती, मंदिर व प्रसादालय विभागांसाठी ई-निविदा पध्दतीने गाईचे शुध्द तूप खरेदीकामी ऑनलाईन चालू असलेल्या निविदेमध्ये शुध्दीपत्रकाद्वारे सुधारणा करणेबाबत.

**निर्णय क्र.५२९** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.१९** दर्शन/आरती पासेसचे देणगी शुल्कात वाढ करणेबाबत.

**निर्णय क्र.५३०** प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला. शासनाव्दारे नियुक्त होणा-या व्यवस्थापन समिती पुढे सदरचा प्रस्ताव सादर करण्यात यावा. (कार्यवाही-जनसंपर्क विभाग)

---

**विषय नं.२०** मयत झालेले कायम/संस्थान कंत्राटी/लेबर/सिक्युरिटी ठेकेदाराकडील कंत्राटी कर्मचारी यांचे वारसांना आऊटसोर्स कंत्राटदारामार्फत कामावर घेण्यात आलेले आहे त्यांना सहानुभुतीचे दृष्टीने लेबर/सिक्युरिटी ठेकेदारामार्फत कामावर घेणेबाबत.

**निर्णय क्र.५३१** याबाबत शासनाचे धोरण तपासून त्या अनुषंगाने फेर प्रस्ताव सादर करावा.
(कार्यवाही-कामगार विभाग)

---

**विषय नं.२१** श्री साईबाबांचे दर्शनाकरिता येणा-या साईभक्तांचे विनंतीनुसार वैयक्तीक साईसेवक योजना नव्याने सुरू करणेस व पुर्वीच्या साईसेवक योजना नियमावलीत बदल करणेबाबत.

**निर्णय क्र.५३२** अभ्यासाची आवश्यकता आहे. शेगाव व अक्षरधाम (गुजरात) यांचे धर्तीवर फेर प्रस्ताव सादर करावा.
(कार्यवाही-कामगार विभाग)

---

**विषय नं.२२** सन २०२३-२४ करिता कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टरची नेमणूक करण्यासाठी दाखल करण्यात आलेले सिव्हील ॲप्लीकेशन क्र.३६८१/२०२३ मधील मा. न्यायालयाच्या दि.११.०८.२०२३ रोजीचे आदेशाप्रमाणे सध्याचे सिक्युरिटी कंत्राटदारांना दि.३१.१२.२०२३ अखेरपर्यंत अथवा जनहित याचिका क्रमांक १५/२०२३ मध्ये मा.न्यायालयाचे आदेश होईपावेतो सध्याचे कंत्राटदार यांना सध्या चालू आहे त्या दरात मुदतवाढ देणेबाबत.

**निर्णय क्र.५३३** नोंद घेतली. (कार्यवाही-कामगार विभाग)

---

**विषय नं.२३** **संस्थानचे बेंगलोर, चेन्नई व हैद्राबाद येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.५३४** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२४** **विभागीय चौकशी अधिकारी यांचे नेमणुकीबाबत**

**निर्णय क्र.५३५** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२५** **संस्थान कायम व संस्थान कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश देणेबाबत. (रु.९१,९०,०००/-)**

**निर्णय क्र.५३६** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२६** **श्री साईआश्रम नं.०१ श्री साईबाबा भक्तनिवास ५०० रुम व साईआश्रम धर्मशाळा इमारत परिसरात असलेले बगीचामध्ये खेळणी बसविणेबाबत. (रु.६६,२९,२००/-)**

**निर्णय क्र.५३७** **प्रस्तावात नमुद ४ नग खेळणी सेट ऐवजी ३ नग खेळणी सेट खरेदी करण्यास व त्याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**विषय नं.२७** **संस्थान मालकीचे मौजे निमगाव को-हाळे येथील नविन शैक्षणिक संकुल इमारत परिसरातील लॉन लावून परिसर सुशोभित करणेकामी येणा-या रु.१८,६३,२५६/- मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५३८** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**विषय नं.२८** **संपुर्ण शिर्डी शहर साफसफाईची सर्व कामे ठोक पध्दतीने करुन घेणेकामी शिर्डी नगरपरिषद, शिर्डी यांना अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत. (मासिक रु.५८,५८,५९९/-)**

**निर्णय क्र.५३९** **संस्थानचा दैनंदिन सुका कचरा शिर्डी नगरपरिषद, शिर्डी यांनी उचलण्याच्या अटीवर प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.**

**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.२९** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Medical Oxygen, Nitrus, Carbon dioxide गॅस खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत. (रु.१,३७,६५,७२२/-)

**निर्णय क्र.५४०** प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करावे.
(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

---

**विषय नं.३०** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे मशिनरी / उपकरणे/फर्निचर/इन्स्ट्रयुमेंट व किरकोळ साहित्य शासनाच्या Mahatender व Gem Portal वरुन खरेदी करणेस व त्या अनुषंगाने येणा-या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत. (रु.४२,७७,७०,९४०/-)

**निर्णय क्र.५४१** प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करावे.
(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

---

**विषय नं.३१** दि.१ एप्रिल,२०२२ ते दि.३१ मार्च, २०२३ अखेर या कालावधीत वाटप करणेत आलेली अनुदान रक्कम व रुग्ण संख्या यांची नोंद घेणेबाबत. (रु.१,८३,६२,५००/-)

**निर्णय क्र.५४२** नोंद घेतली.
(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.३२** श्री साईबाबा हॉस्पिटल मधील एम.आर.आय. मशिन्सचे सन २०२३ ते २०२८ या पाच वर्षाकरीता कॉम्प्रेहेन्सीव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत. (रु.३,१३,८८,०००/-)

**निर्णय क्र.५४३** प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करावे.
(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

---

**विषय नं.३३** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत. (रु.४,१६,००,०००/-)

**निर्णय क्र.५४४** प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करावे.
(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

---

**विषय नं.३४ संस्थानचे दोन्ही रुग्णालयाचे मंजूर उपचार दरातील व तज्ज्ञ डॉक्टरांना कामाच्या प्रमाणात देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.५४५ तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३५ श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कॅशलेस उपचार सुविधा सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.५४६ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१ वार्षिक वेतनवाढ (Increment) इतर मागण्याबाबत डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, ई.एन.टी.सर्जन यांचे दि.२९.११.२०२२ रोजीचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.५४७ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२ गेट नं.४ समोरील नगर-मनमाड ते व्दारकामाई चावडीपर्यंतचा रस्ता तसेच चावडीपासून ते १६ गुंठे (सभा मंडप) चे पुर्व बाजूकडील रस्ता पिंपळवाडी रोडपर्यंत तसेच साईउद्यान इमारत कोप-यापासून ते गेट नं.१ पर्यंत असलेला रस्ता (पिंपळवाडी रोड) हे रस्ते संस्थाचे ताब्यात घेऊन संस्थानमार्फत देखभाल करणेबाबत.**

**निर्णय क्र.५४८ वरील प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर करावा.**
**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३ श्री साईबाबा संस्थानची ध्वनिक्षेपन यंत्रणा अद्यावतीकरण करणेकामी तांत्रिक सल्लागार श्री.नितीन कुलकर्णी यांनी कळविलेल्या अंदाजे रक्कम रु.१६,१६,१३,८२८/-मात्र (सर्व करांसहीत) खर्चास तसेच सदर कामी ई-निविदा प्रक्रिया राबवून कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५४९ श्री.नितीन कुलकर्णी यांना समितीसमोर सादरीकरणासाठी बोलविण्यात यावे.**
**(कार्यवाही-ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४ Indian Oil Corporation Ltd. (IOCL) यांचेमार्फत ५ नग State of the Art Water Proof LED Screen देणगी स्वरुपात घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५५० प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५ संस्थानचे मंजुर आकृतीबंधातील रिक्त पदांवर सेवानिवृत्त शासकीय/ निमशासकीय अधिकारी यांचे मधून तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५५१ तहकुब. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषयनं.६ संस्थानचे सर्व निवासस्थानामध्ये खोली देतेवेळी साईभक्तांकडून अनामत (डिपॉझिट) रक्कम घेणेबाबत.**

**निर्णयक्र.५५२ तहकुब. (कार्यवाही-साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषयनं.७ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमधील ई-निविदेत दर प्राप्त न झालेल्या Tablet, Injection, Syrup, Ointment, Drop करीता दर निश्चति (Rate Contract) करणेकामीच्या फेर ई-निविदा अनुसरुन प्राप्त निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस तसेच उर्वरीत औषंधाकरीता कोटेशन मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.५५३ निम्नतम दरधारक यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. उर्वरीत करीता फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषयनं.८ सन २०२३ दिपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**निर्णय क्र.५५४ प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषयनं.९** **डिजीटल वजनकाटा (Weigh Bridge) खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णयक्र.५५५** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषयनं.१०** **श्री साईप्रसादालय येथील जुनी सोलर स्टीम कुकींग यंत्रणा बायबॅक करुन नवीन अत्याधुनिक सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णयक्र.५५६** **तहकूब.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.५१२ ते ५५६ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ. ०९.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(पी.शिवा शंकर,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**